# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती

(इतिहास)



: संपादक :
प्रा.डॉ.बी.के.शेप
: मुख्य संपादक :
प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

# २३. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

प्रा.जाधवर बी.
(इतिहास विभाग प्र
बलभीम महाविद्यालय.

**प्रस्तावना :-**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात मोठ्या प्रमाणावर सामाजिक प्रबोधनातुन आ कार्याचा ठसा निर्माण करणारे अनेक समाज सुधारक होऊन गेले. त्या समाजसुधारका राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो. त्यानी शैक्षणिक, सामा व आर्थिक कार्याच्या माध्यमातुन बहूजन समाजाला जागृत करुन त्यांची समाजाच्या विविध प्रगती घडवुन आणणारे प्रजाहिदत्त राजा किंवा शासक म्हणुन महाराजाकडे पहावे ल राजर्षी शाहू महारांनी समाज सेवेच्या तत्वाचा स्विकार केल्यानंतर स्विकारलेल्या त कोणतीही तडजोड न करता त्यांनी जे कार्य केले त्यामुळे त्यांचे व्यक्तीमत्व केवळ को संस्थानापुरतेच मार्यादित न राहता फक्त महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारत देशातही ले झाले. त्यामुळे एक आदर्श राजा व बहूजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोक शेवट पर्यंत टिकून राहिली. देशामध्ये वास्तव्य करणाऱ्या सर्वसामान्य समाजाचे हित जोप आपले एकमेव कार्य आहे. हे सांगून समाजालाही या कर्तव्याच्या अनुरोधाने मार्गदर्शन केल काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले सर्वांगीण वर्चस्व निर्माण केले ते वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी बहुजन समाजावर निरनिराळी सामाजिक व धार्मि लादली होती.

*** राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचे प्रारंभीक कार्य :-**

राजर्षी शाहू महाराजांची एकूण अठ्ठावीस वर्षाची कारकीर्द या काळात त्यां उल्लेखनीय कार्य केलेली आहेत. त्यापैकी त्यांना मिळालेल्या अधिकारांचा त्यांनी वाप सामान्य जनांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले. बहूजन समाजाला न्याय मिळवून दे त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व स्विकारले आणि संस्थानातील समाज व्यवस्थेत बद आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या वरिल धोरणास मोठयाप्रमाणावर विरोध झाला. पण अतिशय संयमाने सहन केला. त्यांनी सत्ता ग्रहण करत असताना संस्थानातील जनतेर महाराजांची अनेक योजना घोषित केल्या होत्या. ''आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट त्यांच्या हिताची एक सारखी अभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानाचा सर्व बाजुं व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे यासाठी सर्वांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व स आम्हाला आवश्यकता आहे.'' शाहू महाराजांच्या वरील विधानावरुनच समाजाविष मनात असलेली तळमळ आणि कार्याविषयीची इच्छा स्पष्ट होते.

ISBN 978-93-5240-091-1

## * राजर्षी छत्रपती शाहु महाराजांचे शैक्षणिक कार्य :-

राजर्षी शाहू महाराजांच्या अनेक कार्यापैकी त्यांचे शैक्षणिक कार्य हे अतिशय महत्वाचे मानले जाते. महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रमाणेच शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक सुधारणांच्या कार्यात शैक्षणिक उपक्रमांना महत्वाचे स्थान दिले. राजर्षि शाहूनी संस्थानाचा कारभार स्विकारला तेव्हा संस्थानातील मोजकीच मंडळी मॅट्रीक उत्तीर्ण झालेली होती. कारण खेडयामध्ये प्राथमिक शाळांचा अभाव होता. याशिवाय सर्वसामान्य बहूजन समाज अज्ञान आणि अंधश्रध्देचे जिवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्रम्हण व सावकार यांचेच काम आहे. ते बहुजनासाठी नाही अशी समाजाची समजुन होती कारण ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये ब्राम्हण समाजाची मक्तेदारी होती पण कालांतराने ब्रिटिशांनी विद्येची दार सर्व जातीसाठी खुली केली. पूर्वीपासून ज्यांना विद्याभ्यासाची परंपरा नव्हती त्यांना या नव्या संधीचा लाभ घेता आला नाही. त्यामुळे बहुजन समाज अज्ञान आणि दारिद्र्याचे जिवन जगत होता. त्या समाजात ज्ञान ज्योत लावण्यासाठी प्राथमिक शिक्षणापसुन उच्च शिक्षणापर्यंत विविध सोई उपलब्ध करुन देण्याचे धोरण शाहू महाराजांनी अंगीकारले. या कार्यात येणाऱ्या समस्यावर कशी मात करता येईल याचे महाराजांनी नियोजन केले. शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती झालेली नाही या गोष्टीला त्या त्या देशांचा इतिहास साक्षीदार आहे. अज्ञानात चाचपडत पडलेल्या समाजातुन देशात उत्तम मुत्सघी आणी लढणारे विर कधीच तयार होणार नाहीत त्यमुळे सक्तीच्या आणि मोफत्त शिक्षणाची भारतीयांना मोठी गरज आहे असे शाहू महाराजांनी स्पष्ट केले होते.

## प्राथमिक शिक्षण आणि शाहू महाराजांची भूमिका :-

बहूजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महाराजांनी योग्य दिशेने प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातुन अतिशय मजबुत पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा मोठा माणस होता. इस. १९१३ मध्ये प्रत्येक गावात एक शाळा आणि ती शाळा गावातील सर्वसामान्य जातीच्या व्यक्तीने चालवावी. यासाठी शाहू महाराजांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या वरील आदेशानुसार निरनिराळया खेडयात मंदिरे, चावडी, धर्मशाळा आशा इमारतीमधुन प्राथमिक शाळा सुरु झाल्या. त्यांच्या दुरुस्ती देखरेख व बांधकाम याची जबाबदारी पाटील, कुलकर्णी, व इतर सामान्य प्रजाजनावर सोपवली होती. एकंदर शिक्षणाच्या कार्यात समाजाचा सहभाग मिळवण्याची त्यांनी योजना केल्याचे दिसुन येते. बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातुन छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोणातुनच त्यांनी निरनिराळया शिक्षण संस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठया प्रमाणावर विकास झाला.

## सक्तीचे शिक्षण आणि शाहू महाराज :-

भारतामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय बहुजनांचा होता. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती या व्यवसयात गुंतला होता. एवढेच नाही तर समाजातील अज्ञानामुळे शिक्षणाचे महत्व समाजाला समजत नव्हते. त्यामुळे त्यांनी सक्तीच्या धोरणाचा आवलंब केला. त्यासाठी त्यानी शाळा कोठे

ISBN 978-93-5240-091-1

सुरु करता येईल आणि शिक्षण या कोणत्या इमारती वापरता येतील याची प्रथम माहिती घेतली. या नंतर योग्य ठिकाणी तात्काळ शाळा सुरु करण्याचे त्यांनी आदेश दिले. देवस्थानच्या उत्पन्नातुन शिल्लक असलेले पैसे हे शाळेच्या विकासासाठी खर्च करावेत असे त्यांनी सांगितले. एवढेच नाही तर २५ जुलै १९१७ च्या आदेशानुसार महाराजांनी प्राथमिक शाळेत फी माफीची घोषणा त्यानी केली. २१ नोव्हे १९१७ रोजी काढलेल्या जाहिरनाम्यानुसार कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. खेडयातुन या सक्तीच्या शिक्षण योजनेचा अंमल सुरु झाला. या सक्तीच्या व मोफत शिक्षण योजतेमुळे शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरुप प्राप्त झाले. या धोरणाचा इतका फायदा झाला की १९१७-१८ साली शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या १२९६ होती ती १९२१-२२ मध्ये ४२० शाळा व २२,००७ विद्यार्थी इतकी वाढलेले दिसते.

राजर्षि छत्रपती शाहु महाराजांचा केवळ शिक्षण देणे, सोय करणे किंवा शिक्षणविस्तार करणे एवढा मर्यादित हेतु या प्रयत्नामागे नव्हता. तर जनसामान्यांच्या मनात शिक्षणासंबंधीची अभुतपुर्व लालसा रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यानी शेती व मोलमजुरी करणाऱ्या जातींच्या मुलांना अस्पृश्य जातीतील मुलांना नादारी द्यावी व त्यानंतर व्यापारी, सावकारी पुढारलेल्या जातीतील मुलांना द्यावी असे त्यांचे धोरण होते. बहुजनसमाजाला पत, प्रतिष्ठा व स्वतंत्र्य सामाजिक दर्जा मिळवुन देण्याचा महाराजांनी प्रयत्न केलेला आहे.

**स्त्रीशिक्षणा बाबत शाहू महाराजांची भुमिका :-** बहुजन समाजाप्रमाणेच स्त्रीजीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवतलत महाराजांनी जाहीर केलेली होती. आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानाचे शिक्षण खाते त्यांच्याकडे सोपवल्याचा महाराजांचा विचार होता. परंतु राणीसाहेबांच्या निधनामुळे तो विचार पुर्ण झाला नाही. वरील विचारावरुन महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण स्पष्ट होतो. स्त्री शिक्षणामुळे कुटूबांचा समाजाचा अप्रत्यक्षपणे विकास घडुन येतो. स्त्रीला कुटूंबात व समाजात आदराचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते असा महाराजांचा विश्वास होता.

एकंदर वरील प्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षण विषयक संस्थानातील कार्य वेगवेगळया मुद्यांच्या आधार या शोध निबंधात नमूद केलेला आहे.

**संदर्भ सूची :**

१) प्रा.भिडे जी.एल.- महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर,२००६
२) धनंजय किर - म.जोतीराव फुले-आजच्या समाजक्रांतीचे जनक-१९६८
३) वाळिंबे रा.शं.- १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक पुर्नघटना भाग-१ पुणे, १९६२
४) सरदार गं.बा. - महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, १९८२
५) सरदार गं.बा. - महाराष्ट्राची सामाजिक प्रबोधनाची वाटचालृ
६) सरदार गं.बा. - महाराष्ट्राचे उपेक्षीत मानकरी, १९४१

❖❖❖